## मानक क्र. ९७

**४.८.१ शाळा शिक्षकांना मातृभाषा / स्थानिक / बोली भाषेत शिकविण्याचे शैक्षणिक साहित्य पुरविते.**

**निवडलेला स्तर :** ४

**सर्व साहित्य स्थानिक / प्रादेशिक भाषेत उपलब्ध आहे व त्याचा वापर केला जातो.**

**१.१ शाळा मातृभाषा व स्थानिक/प्रादेशिक भाषेत विद्यार्थी व शिक्षकांना शैक्षणिक साहित्य (TLM) उपलब्ध करून देते.**

महाविद्यालयात संपूर्ण शैक्षणिक साहित्य विद्यार्थी व शिक्षकांसाठी मातृभाषेत (मराठीत) उपलब्ध करून दिले जाते. आमची सर्व अभ्यासक्रम सामग्री, नोट्स, संदर्भ पुस्तके आणि शिकविण्याचे साहित्य पूर्णतः मराठीत असते.

**२.१ किमान २५% (TLM) शैक्षणिक साहित्य स्थानिक / प्रादेशिक भाषांमध्ये उपलब्ध आहे व त्याचा वापर करतात.**

महाविद्यालयात १००% शैक्षणिक साहित्य स्थानिक (मराठी) भाषेत उपलब्ध आहे आणि विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात त्याचा सक्रियपणे वापर केला जातो.

**३.१ किमान ५० % (TLM) शैक्षणिक साहित्य स्थानिक / प्रादेशिक भाषांमध्ये आहे व त्या साहित्याचा प्रमाणभाषेशी सांगड घालून वापर केला जातो.**

आम्ही प्रमाणभाषा आणि स्थानिक बोली यांचा योग्य तो समन्वय साधत शिक्षण देतो. अभ्यासक्रमातील कोणतेही संकल्पना विद्यार्थ्यांना अधिक सुलभ व्हाव्यात म्हणून प्रमाणभाषेच्या संज्ञांचा योग्य प्रकारे वापर करून मराठीत सुसंगतपणे शिकवले जाते.

**४.१ सर्व साहित्य स्थानिक / प्रादेशिक भाषेत उपलब्ध आहे व त्याचा वापर केला जातो.**

महाविद्यालयातील सर्व अभ्यासक्रम, व्याख्याने, संदर्भ साहित्य, तसेच सर्व प्रकारच्या शैक्षणिक आणि प्रशासकीय प्रक्रियांसाठी संपूर्णपणे मराठी भाषेचा वापर केला जातो. विद्यार्थ्यांना मराठीतून शिकण्याचा संपूर्ण आधार मिळावा यासाठी आम्ही प्रादेशिक भाषेतील साहित्याची सतत वाढ करत आहोत.

# इंदिरा कनिष्ठ महाविद्यालय, कळंब


## प्रमाणपत्र

हे प्रमाणित करण्यात येते की इंदिरा कनिष्ठ महाविद्यालयामध्ये संपूर्ण शैक्षणिक साहित्य विद्यार्थी व शिक्षकांसाठी मातृभाषेत (मराठीत) उपलब्ध करून दिले जाते. आमची सर्व अभ्यासक्रम सामग्री, नोट्स, संदर्भ पुस्तके आणि शिकविण्याचे साहित्य पूर्णतः मराठीत असते.

P. B. Mudatke.

PRINCIPAL
Indira Mahavidyalaya
Kalamb Dist.Yavatmal

मराठी बोलीभाषा प्रकल्प



## माहिती पुस्तकातील मराठी मधील सूचना

# इंदिरा महाविद्यालय, कळंब

### माहिती पत्रक – सन २०२४–२५

कळंबसारख्या उपेक्षित ग्रामीण भागातील दीन-दलित, इतर मागासवर्गीय, आदिवासी आणि गोरगरीब शेतकऱ्यांच्या मुलांसाठी उच्च शिक्षणाची गरज लक्षात घेऊन मानवंत शिक्षणतज्ञ व सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. भाऊ मांडवकर यांनी पुढाकारपूर्वक ब्रिटिशकालीन प्रसिद्ध डॉ. बळवंत मोरेश्वर वैद्य यांच्या नावे १९७२ साली (मान्यता २५ फेब्रुवारी १९७४) ट्रस्ट स्थापन करून आपल्या जन्मगावी २० जून १९८३ रोजी हे महाविद्यालय सुरू केले. कळंब-राळेगाव मार्गावर कळंब बसस्थानकापासून सुमारे अर्धा कि.मी. अंतरावर निसर्गाच्या सान्निध्यात, प्रशस्त जागेत, भव्य इमारतीत हे महाविद्यालय वसले.

### शैक्षणिक सत्र व शैक्षणिक वेळापत्रक

प्रथम सत्र - मंगळवार ११ जून ते शनिवार २६ ऑक्टोबर २०२४

प्रथम सत्र अवकाश - सोमवार २८ ऑक्टोबर ते सोमवार १७ नोव्हेंबर २०२४

द्वितीय सत्र - सोमवार १८ नोव्हेंबर २०२४ ते २१ एप्रिल २०२५

द्वितीय सत्र अवकाश - मंगळवार २२ एप्रिल ते गुरुवार ५ जून २०२५

### शैक्षणिक वेळापत्रक

१. जुलै

प्रवेश प्रक्रिया – १ जुलै ते १८ जुलै

अभिक्रम प्रक्रिया प्रथम वर्षाकरिता (Induction Programme)– ११ जुलै ते १६ जुलै

अध्यापन कार्यारंभ – २५ जुलै

कॉलेज डेव्हलपमेंट कौन्सिलची पहिली सभा – १८ जुलै

रा से यो सल्लागार समितीची पहिली सभा – २० जून

वृक्षारोपण – १ जुलै ते १० जुलै

रा से यो प्रवेश प्रक्रिया व उद्बोधन – १८ जुलै ते ३१ जुलै

२. ऑगस्ट

प्रथम घटक चाचणी (वरिष्ठ महाविद्यालय) – १ ऑगस्ट ते ११ ऑगस्ट

विविध विषय अभ्यास मंडळ स्थापना – ५ ऑगस्ट ते १४ ऑगस्ट

